पुढारी दि. 3.10.25

संक्षिप्त



उमरखेड पोलिसांनी घरफोडी आणि मोबाइल चोरीच्या गुन्ह्यातील दोन सराईत आरोपींना अटक करून २ लाख ८३ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

## दोन सराईत आरोपींना पोलिसांकडून अटक; २.८३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**उमरखेड, पुढारी वृत्तसेवा :** उमरखेड पोलिसांनी घरफोडी आणि मोबाइल चोरीच्या गुन्ह्यात सामील असलेल्या दोन सराईत आरोपींना अटक करून त्यांच्याकडून २ लाख ८३ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत पोलीसांकडुन मिळालेल्या माहीती नुसार, १० जुलै २०२५ रोजी रेखा खरुसकर यांनी त्यांच्या घरातून १० हजार रुपये रोकड आणि ६ ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र चोरी झाल्याची तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली. तांत्रिक माहिती आणि गुप्त सूत्रांच्या आधारे तपास करत अर्जुन उत्तम कणकापूरे (वय-३२) व अरिहंत उर्फ संतोष कस्तुरे (वय-४२) यांना ताब्यात घेतले. या दोघांनी सदर गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपींकडून एकूण ५ घरफोड्या आणि ७ मोबाइल चोरीचे गुन्हे उघडकीस आले. या गुन्ह्यांमधील रोकड आणि चोरी केलेले मोबाइल असा एकूण २ लाख ८३ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सागर इंगळे आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली. पोलीस अधीक्षक कुमार चिंता व उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड या पथकाचे कौतुक केले आहे.